*नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,*
*तळमजला,नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर,पुणे 1*
*दूरध्वनी क्र.020-26123826 फॅक्स क्र.020-26129949*
*ई-मेल आयडी- do4.igro@igrmaharashtra.nic.in*

---

क्र.का.4/प्र.क्र.1488/2021/1458 दिनांक - 03/08/2023.

विषय- ई-रजिस्ट्रेशन प्रणालीदवारे नोंदणी होणा-या दस्तांना तसेच ई-फायलिंग व्हर्जन्-1 दवारे फायलिंग होणा-या नोटीसांना दस्त हाताळणी शुल्क आकारणी करण्याबाबत.

**परिपत्रक** -

ई-रजिस्ट्रेशन / ई-फायलिंग या जरी ऑनलाईन सुविधा असल्या तरी सॉफ्टवेअर देखभाल, अदययावतीकरण, सर्व्हर, स्टोअरेज व ई-रजिस्ट्रार हार्डवेअर व कनेक्टीव्हिटी वरील खर्च, माहितीचा प्रचार व प्रसिध्दीवरील खर्च इ. आवश्यक असल्याने तो खर्च भागविण्यासाठी ई-रजिस्ट्रेशन / ई-फायलिंग सेवांकरिता सुध्द्रा दस्त हाताळणी शुल्क आकारणी आवश्यक झाले आहे.

विभागाने दस्त हाताळणी शुल्काचे प्रदान करण्याकरिता ई-प्रदान सुविधा सन 2019 पासून उपलब्ध करुन दिलेली आहे. या ई-प्रदान प्रणालीची आय-सरिता दस्त नोंदणी प्रणाली तसेच ई-फायलिंग प्रणाली बरोबर जोडणी करण्यात आली आहे.

शासन निर्णय महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक - नोंदणी-2022/प्र.क्र.574/म-1(धोरण), दि. 21/07/2023 दवारे, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक-नोंदणी-2022/प्र.क्र.574/म-1(धोरण), दि. 21/07/2023 अन्वये ई-रजिस्ट्रेशन प्रणालीदवारे नोंदणी होणा-या दस्तांना तसेच ई-फायलिंग व्हर्जन-1 दवारे फायलिंग होणा-या नोटीसांना दस्त हाताळणी शुल्क आकारणी करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व दुय्यम् निबंधक व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की,

त्यामध्ये ई-रजिस्ट्रेशन अंतर्गत लिव्ह अँड लायसन्स् करारासाठी, ई-रजिस्ट्रेशन पध्दतीने सदनिका विक्री करारनाम्याची नोंदणी करताना व ई-फायलिंग व्हर्जन-1 मधून होणा-या ई-फायलिंग सेवांकरिता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दस्त हाताळणी शुल्क आकारण्याची व ई-रजिस्ट्रेशन / ई-फायलिंग सेवांकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम राज्य् पातळीवर नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य्, पुणे यांच्या नावे व जिल्हा पातळीवर संबंधित अधिका-यांच्या नावे उघडण्यात आलेल्या “स्वीय प्रपंची लेखे”(PLA) या खात्यात जमा करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सेवा | शुल्क् |
|---|---|---|
| 1. | लिव्ह अँड लायसन्स करार | रु. 300/- (रुपये तीनशे फक्त) |
| 2. | सदनिका विक्री करारनामा | रु.1000/-(रुपये एक हजार फक्त) |
| 3. | ई-फायलिंग सेवा | रु.300/- (रुपये तीनशे फक्त) |

सदर शासन निर्णयाची दि. 07/08/2023 पासून काटेकोरपणे अंमलबजावणी करणेकरिता आपले अधिनस्त दुय्यम् निबंधक यांना अवगत करावे. तसेच सह जिल्हा निबंधक यांनी दस्त् हाताळणी शुल्काबाबत नागरिकांच्या माहितीसाठी योग्य् ती प्रसिध्दी दयावी. त्याचप्रमाणे नागरिक व दुय्यम् निबंधक यांना याबाबत योग्य् ते मार्गदर्शन करावे. व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

3/8/23

(हिरालाल सोनवणे) भा.प्र.से.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

1) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
2) नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक), महाराष्ट्र राज्य्, पुणे.
3) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सर्व सह जिल्हा निबंधक.(नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचे मार्फतीने).
5) सर्व दुय्यम निबंधक (सह जिल्हा निबंधक यांचे मार्फतीने)

ई-रजिस्ट्रेशन प्रणालीव्दारे नोंदणी होणाऱ्या दस्तांना तसेच ई-फायलिंग व्हर्जन -१ व्दारे फायलिंग होणाऱ्या नोटीसांना दस्त हाताळणी शुल्क आकारणी करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- नोंदणी-२०२२/प्र.क्र.५७४/म-१(धोरण)**
दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः- २१ जुलै, २०२३.

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक-मुद्रांक-२००१/२७६/प्र.क्र.१०२/म-१ दि. २०.०८.२००१.
२) शासन ज्ञापन क्रमांक दि. ३१.१०.२००१.
३) नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र क्र. का.४/ ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग सुधारणा/१६७०, दि.१४/१०/२०२२.

**प्रस्तावना:-**

ई-रजिस्ट्रेशन / ई-फायलिंगचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत जाणार असून तेवढ्या प्रमाणात पारंपरिक पद्धतीने दस्त नोंदणी / फायलिंग कमी होणार आहे व पारंपारिक दस्त नोंदणी /फायलिंग मधून मिळणारे दस्त हाताळणी शुल्क रक्कम कमी होत जाणार असल्याची बाब निदर्शनास येते आहे. ई-रजिस्ट्रेशन / ई-फायलिंग या जरी ऑनलाईन सुविधा असल्या तरी, सॉफ्टवेअर देखभाल, त्याचे अद्ययावतीकरण, सर्व्हर, स्टोरेज व ई-रजिस्ट्रार हार्डवेअर व कनेक्टीव्हिटी वरील खर्च, माहितीचा प्रसार, प्रचार व प्रसिद्धीवरील खर्च इ. आवश्यक असणारे खर्च होतच राहणार आहेत. त्यामुळे सदर खर्च भागविण्यासाठी ई-रजिस्ट्रेशन/ई-फायलिंग सेवांकरिता दस्त हाताळणी शुल्क आकारणे आवश्यक आहे.

ई-रजिस्ट्रेशन अंतर्गत लिव्ह अँड लायसन्स करारासाठी रूपये ३००, ई-रजिस्ट्रेशन पद्धतीने सदनिका विक्री करारनाम्याची नोंदणी करताना रूपये १००० व ई-फायलिंग व्हर्जन-१ मधून होणाऱ्या ई-फायलिंग सेवांकरिता रूपये ३०० इतके दस्त हाताळणी शुल्क आकारण्याची व ई-रजिस्ट्रेशन/ई-फायलिंग सेवांकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम राज्य पातळीवर नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे व जिल्हा पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या नावे उघडण्यात आलेल्या “स्वीय प्रपंची लेखे” (PLA) या खात्यात जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ई-रजिस्ट्रेशन अंतर्गत लिव्ह अँड लायसन्स करारासाठी, ई-रजिस्ट्रेशन पद्धतीने सदनिका विक्री करारनाम्याची नोंदणी करताना व ई-फायलिंग व्हर्जन-१ मधून होणाऱ्या ई-फायलिंग सेवांकरिता

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दस्त हाताळणी शुल्क आकारण्याची व ई-रजिस्ट्रेशन/ई-फायलिंग सेवांकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम राज्य पातळीवर नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे व जिल्हा पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या नावे उघडण्यात आलेल्या “स्वीय प्रपंची लेखे” (PLA) या खात्यात जमा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवा | शुल्क |
|---|---|---|
| १. | लिव्ह अँड लायसन्स करार | रू. ३००/- (रुपये तीनशे फक्त) |
| २. | सदनिका विक्री करारनामा | रू. १,०००/-(रुपये एक हजार फक्त) |
| ३. | ई-फायलिंग सेवा | रू. ३००/-(रुपये तीनशे फक्त) |

३. नोंदणी अधिनियम, १९०८ व त्या खालील नियमामध्ये आवश्यक ती तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौ.क्र. २०२२/२३२/कोषा.प्रशा.५ दि.१७.१२.२०२२ व अनौसं/ १८८/सा.सं. दि.१६.०१.2023 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७२११२३५५५३७१९ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=1085617af371f507cb8ee4d914eb645d92480247b61bd58b5c3074ba3a6a62d7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2023.07.21 12:37:08 +05'30'

**( सत्यनारायण बजाज )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई- ३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२.
५. मा. सभापती/ अध्यक्ष,(विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई-३२.
६. मा. उपसभापती/ उपाध्यक्ष,(विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन,मुंबई ३२.

७. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,विधान भवन,मुंबई-३२.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग (व्यय-१०/ कोषाप्र-५/सासं) मंत्रालय, मुंबई-३२.
१०. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
१२. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१.
१३. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक.
१४. सर्व नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
१५. सर्व जिल्हा कोषागर अधिकारी.
१६. निवडनस्ती, कार्यासन (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.